# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी** , पहिला माळा, बी विंगवनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१

दुरध्वनी क्र. ०७१२-२५५६९१६ , ई-मेल: apccfnodal@mahaforest.gov.in


**ई-मेलव्दारे/महत्वाचे**

क्र.कक्ष-१७(२)/नोडल/छ.सं.नगर/परि.आयडी-१३७७९/११८२/२०२५-२६

नागपूर ४४० ००१, दिनांक १९/०८/२०२५

**विषय** :- Proposal seeking ex-facto approval of the Central Government under section-2 of the Van ( Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 for non-forestry use of 18.18 ha of Forest land in favour of Public Work division Nanded for AU-108-Two lanning of Distric Boundary to Chuncha-Manahtabarad-Mudkhed Road with paved shoulder in Nanded District under HAM SH-261 of Km 000/000 to Km 48/700 and AU-109 Two lanning of Mudkhed –Gadga-Khandgaon-Mukhed –Savargaon (BK)-Jamb to district Border road with paved shoulder in Nanded district in the State of Maharashtra- regarding

**संदर्भ** :- १. केंद्र शासनाचे दिनांक २/०४/२०२४ रोजी परिवेश पोर्टवर वर उपस्थित केलेल्या त्रूट्या.

२. आपले कडील पत्र क्रमांक कक्ष-५/जमीन/FCA/१४३७, दि. ५/०२/२०२५.

३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१७(२)/नोडल/छ.सं.नगर/परि.आयडी-१३७७९/२७९४, दि. १३/०३/२०२५.

४. आपले कडील पत्र क्रमांक कक्ष-५/जमीन/FCA/४०५, दि. २१/०७/२०२५.

विषयांकित प्रकरणी या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये उपस्थित केलेल्या १ ते ५ त्रूटिंची पूर्तता आपण संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये केलेली आहे. सदर त्रृटि पूर्तता अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये खालील प्रमाणे पुन:श्च त्रृटि असल्याचे निर्दशनास दिसून आले आहे.

१. त्रृटि पूर्तता क्रमांक १ मध्ये Plantation करिता जी KML File सादर करण्यात आली आहे. त्या मध्ये Plantation क्षेत्र दिसून येत नाही. करिता नव्याने गट निहाय Plantation क्षेत्र दर्शवून त्याबाबतची सुधारित KML File C.D व्दारे सादर करावी.

२. त्रृटि पूर्तता क्रमांक २ नुसार आपण वन तसेच वनेत्तर जमिनीचा समावेश असलेल्या प्रकल्पाची KML File दुरूस्त आणि पूर्ण करून सादर केल्याबाबत नमूद केले आहे. परंतु परिवेश पोर्टलवर याबाबत खात्री केली असता त्यावर आपल्या मार्फत कोणतेही माहिती ॲपलोड केली गेली नसल्याचे दिसून येत आहे. तरी आपणांस पुनःश्च कळविण्यात येते की, वन तसेच वनेत्तर जमिनीचा समावेश असलेल्या प्रकल्पाची KML File दुरूस्त आणि पूर्ण करून परिवेश पोर्टलवर ॲपलोड करून त्याबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे.

३. त्रृटि क्रमांक ३ मध्ये आपण डीजीपीएस नकाशा व सर्वे ऑफ इंडिया टोपोशीट नकाशा हा परिवेश पोर्टल वर ॲपलोड केलेला असल्याचे कळविले आहे. परंतु परिवेश पोर्टलवर तपासणी

केले असता डीजीपीएस नकाशा व सर्वे ऑफ इंडिया टोपोशीट नकाशा हा आजमितीस आपल्या कडून ॲपलोड केला गेलेला नाही. तो परिवेश पोर्टवर ॲपलोड करून हार्ड व सॉफ्ट कापी मध्ये सादर करावा.

४. त्रृटि क्रमांक ४ मध्ये सादर करण्यात आलेल्या Violation Report मध्ये मुख्य वनसंरक्षक यांचे अभिप्राय व स्वाक्षरी नाही, ती सादर करण्यात यावी.

प्रकरणी वरील त्रृट्याच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, प्रकल्प यंत्रणेने सादर केलेल्या त्रृटि पूर्तता अहवाल हा बरोबर आहे किंवा नाही याबाबतची शहानिशा आपल्या स्तरावरून करून तो त्रृटिपूर्तता अहवाल बरोबर असल्यास तो वरिष्ठ कार्यालयामध्ये सादर करणे अपेक्षित आहे. परंतू सदर प्रकरणी असे झाल्याचे दिसून येत नाही हे प्रशासकीय दुष्टया योग्य नाही तसेच भविष्यात अशी चूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

तरी वरील प्रमाणे नमूद केलेल्या त्रृटिंची योग्य प्रमाणे शहानिशा करून त्रृटि पूर्तता अहवाल पुनःश्च सादर करावा. तसेच आपले कडिल संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये सादर करण्यात आलेले त्रृटि पूर्तता अंहवालाचे २ प्रती परत करण्यात येते आहे.

सहपत्र :- वरील प्रमाणे २ प्रती.

19/8/25

**( नरेश झुरमुरे)**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंन्द्रथ अधिकारी**

प्रति,

वनसंरक्षक (प्रा),
छत्रपती संभाजी नगर वनवृत्त

प्रतिलिपी :- १. उपवनसंरक्षक, नांदेड वन विभाग यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता रवाना.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता रवाना.